# सातवीच्या विद्यार्थिनींना 'एमएससीआयटी'

## पुणे महापालिकेच्या शिक्षण मंडळाचा उपक्रम

**पुणे, ता. १४ :** पुणे महापालिकेच्या शिक्षण मंडळाच्या शाळांतील इयत्ता सातवीतील विद्यार्थिनींसाठी 'एमएससीआयटी'चे प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत, अशी माहिती मंडळाच्या अध्यक्षा संगीता तिवारी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. या वर्षी जून महिन्यात विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात येईल, असा दावाही त्यांनी या वेळी केला.

### स्वयंसेवी संस्थांवर टीका

**खासगी शाळांकडूनही पालकांना विशिष्ट दुकानातून गणवेश खरेदीची सक्ती केली जाते. त्यांना जाब का विचारला जात नाही, असा सवाल करून संगीता तिवारी म्हणाल्या, "गणवेश खरेदी प्रक्रियेत काही त्रुटी राहिल्या असतील; मात्र ती पारदर्शक पद्धतीने राबविण्याचा प्रयत्न आम्ही करतो. कारण, झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले पाहिजेत, ही भूमिका त्यामागे आहे. काही स्वयंसेवी संस्था विनाकारण त्रास देण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्या 'ब्लॅकमेलिंग' करतात," अशी टीकाही त्यांनी केली.**

मंडळातर्फे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती तिवारी यांनी दिली. त्या म्हणाल्या, "महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची आर्थिक परिस्थिती बेताची असते. त्यामुळे सातवीनंतर त्या घरीच राहतात. त्यांना व्यावसायिक शिक्षण दिल्यास भविष्यात पायावर उभे राहण्याची संधी मिळू शकते. त्यामुळे ही योजना राबविण्यात येणार आहे. या वर्षी सैनिकी शाळा काढण्यात येणार असून, शिक्षकांसाठी 'शिक्षक प्रबोधिनी', तीन नवीन 'क्रीडानिकेतन', विद्यार्थी- शिक्षकांसाठी 'इंग्रजी संभाषण कौशल्य वर्ग', 'आपत्ती व्यवस्थापन', 'कला क्रीडा अकादमी' आदी नियोजित उपक्रम आहेत. विद्यार्थ्यांना गणवेश वेळेत मिळण्याच्या दृष्टीने आणि पारदर्शकपणे ही प्रक्रिया राबविण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे."

विशाखापट्टणम येथे नुकत्याच झालेल्या बॉक्सिंग स्पर्धेत शिक्षण मंडळाच्या बिबवेवाडी येथील शाळेत शिकणाऱ्या सूरज सज्जन पांडागळे या विद्यार्थ्याने सुवर्णपदक पटकाविले. त्याचा सत्कार तिवारी यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी शिक्षणप्रमुख रामचंद्र जाधव उपस्थित होते.